लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०१९,
आदर्श आचारसंहिते संदर्भात छाननी
समिती गठीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सामान्य प्रशासन विभाग,

शासन परिपत्रक क्रमांक : एमसीसी : २०१९/प्र.क्र.२४०/२०१९/३३

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ११ मार्च, २०१९

संदर्भ : भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र.४३७/६/१/ECI/INST/FUNT/MCC/२०१९, दिनांक १०.०३.२०१९.

शासन परिपत्रक :

भारत निवडणूक आयोगाने संदर्भाधिन पत्रान्वये दिलेल्या सूचना विचारात घेऊन लोकसभा सार्वत्रिक निवडणूक -२०१९ आदर्श आचारसंहिते संदर्भातील प्रस्तावांची छाननी करण्यासाठी खालीलप्रमाणे छाननी समिती गठीत करण्यात येत आहे :-

(अ) मुख्य सचिव - अध्यक्ष

(ब) प्रस्तावाशी संबंधित विभागाचे प्रधान सचिव / सचिव - सदस्य

(क) अप्पर मुख्य सचिव (सेवा) - सदस्य

२. आदर्श आचारसंहितेसंदर्भातील प्रस्तावाबाबत करावयाच्या कार्यवाही संदर्भात छाननी समितीची कार्यपध्दती पुढीलप्रमाणे आहे :-

i. छाननी समिती आदर्श आचारसंहितेच्या भारत निवडणूक आयोगाच्या पोर्टलवर उपलब्ध असलेल्या सूचना / स्पष्टीकरण लक्षात घेऊन भारत निवडणूक आयोगाकडे मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत प्रस्ताव पाठविण्यापूर्वी छाननी करेल.
ii. छाननी समिती छाननी करुन प्रस्तावाबाबत शिफारस करेल
iii. छाननी समिती शिफारस केलेले प्रस्ताव संपूर्ण तपशील आणि तातडीबाबतची टिप्पणी यासह मुख्य निवडणूक अधिकारी यांचेकडे सादर करण्यात येतील.
iv. मुख्य निवडणूक अधिकारी छाननी समितीने शिफारस केलेले प्रस्ताव त्यांच्या अभिप्रायासह भारत निवडणूक आयोगाकडे पाठवतील.

३. आदर्श आचारसंहितेसंदर्भातील प्रस्तावाबाबत विभागांनी पुढीलप्रमाणे दक्षता घ्यावी :-

अ) राज्यातील सर्व विभागांनी कोणाताही संदर्भ थेट भारत निवडणूक आयोगास करुन नये.

ब) शासनाच्या संबंधित विभागांनी मूळ नस्ती मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयाकडे सादर करुन नये. छाननी समितीमार्फत स्वयंस्पष्ट प्रस्ताव पाठवावा.

क) भारत निवडणूक आयोगास संदर्भ निकाली काढण्यास काही कालावधी आवश्यक असल्याने अंतिम क्षणी प्रस्ताव पाठविणे टाळावे.

४. उपरोक्त सूचना लक्षात घेऊन प्रशासकीय विभागांनी उचित कार्यवाही करावी अशा सूचना या परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०३१२१११११३६२१०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

ANIL NANSING VALVI

Digitally signed by ANIL NANSING VALVI
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=1a7c28200f6d58206324d8086ffcf99758c115aada508a7437f2ae5d9fa1ba5d, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=328a78fb26991ef7b9493ea647f585c65b1cf01913ae44b41ffee5cc8464f2f1, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ANIL NANSING VALVI
Date: 2019.03.15 17:35:55 +05'30'

(अ. ना. वळवी)
उप सचिव व सह मुख्य निवडणूक अधिकारी,
महाराष्ट्र राज्य

प्रति,

सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग

प्रत :-

१. विभागीय आयुक्त (सर्व)
२. जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)
३. उप जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)